महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: पीडब्ल्यूडी-४२१८/सीआर-२४/२०१८/तेरा दिनांक :- १२ नोव्हेंबर, २०२५

# -:प्रसिद्धीपत्रक:-

विषय :- दिव्यांग उमेदवारांना परीक्षेच्यावेळी लेखनिक/भरपाई वेळ उपलब्ध करुन देणेबाबत.
संदर्भ :- शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक दिव्यांग २०१९/प्र.क्र.२००/ दि. क.२, दिनांक १ ऑगस्ट, २०२५.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांच्यावेळी दिव्यांग व्यक्तिंना परीक्षेच्यावेळी त्यांच्या मागणीप्रमाणे लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळ उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आयोगाच्या संकेतस्थळावर 'दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना' प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणाऱ्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केल्यानंतर संबंधित दिव्यांग उमेदवारांनी लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असल्यास आयोगाकडे संबंधित सर्व कागदपत्रांसह संदर्भीत शासन परिपत्रकातील तरतुदिनुसार विनंती अर्ज सादर करुन पूर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे.

२. आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या खालील जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केलेल्या व लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी विहित नमुन्यातील विनंती अर्ज संबंधित सर्व कागदपत्रांसह **pre-examination@mpsc.gov.in** या ईमेल आयडीवर सादर करणे आवश्यक आहे:-

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | जाहिरात क्रमांक | परीक्षेचा दिनांक | विनंती अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२५ | ११७/२०२५ | २१ डिसेंबर, २०२५ | १७ नोव्हेंबर, २०२५ |
| २ | महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२५ | १२४/२०२५ | ४ जानेवारी, २०२६ | |

३. **संदर्भिय शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र. ७ (ब) मधील तरतुदीनुसार लेखनिकाची कमाल शैक्षणिक अर्हता १२ वी असणे आवश्यक असून त्यानुसार दिव्यांग उमेदवाराने लेखनिकाची मागणी करणे अनिवार्य आहे.**

४. उपरोक्त जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज केलेल्या उमेदवारांनी प्रस्तुत प्रसिध्दीपत्रकातील तरतुदींच्या आधारे विहित पध्दतीने परवानगीसाठी पुन्हा लेखी विनंती अर्ज सादर करणे अनिवार्य आहे.

५. केवळ संबंधित जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करताना लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेकरिता दावा केला म्हणून उमेदवारांना लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय असणार नाही. अर्जाद्वारे दावा करुन उमेदवारांनी विहित पध्दतीने आयोगाकडून स्वतंत्र पूर्व परवानगी घेतली असल्यासच लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय राहील.

६. लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळ आवश्यक असलेल्या उमेदवारांनी प्रपत्र १/प्रपत्र २, लक्षणीय दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र व नमुना क्रमांक ११ अशी कागदपत्रे सादर करावीत.

७. अंधत्व/शारीरिक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधित/ दोन्ही हात नसलेले)/मेंदुचा पक्षाघात असलेल्या उमेदवारांनी नमुना क्रमांक ११ सादर करणे आवश्यक नाही.

८. विहित प्रपत्र १/ प्रपत्र २ व नमुना क्रमांक ११ आयोगाच्या संकेतस्थळावर Candidate Information => Instructions=> Persons with Benchmark Disabilities या सदराखाली शेवटच्या पृष्ठावर उपलब्ध आहेत.

९. प्रस्तुत प्रकरणी उमेदवारांनी शंका/समाधानासाठी ०२२-६९३८५९८३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

सह सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई